# प्रेसनोट दि.२४/०८/२०२४

## ......निगडी पोलीस ठाणेची कामगिरी ......

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे | :- | निगडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड आयुक्तालय |
| २. | गुन्हा रजि. नं. व कलम | :- | ३७४/२०२४ बीएनएस कलम ७४,७८,७९,३५१(२),११५(२),१३ सह बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनीयम कलम ७,८,९(f),९(l),९(m), ९(t),१०,११,१२,१६,१७,१९ सह बालकांची काळजी व संरक्षण अधिनीयम २०१५ चे कलम ७५, अनुसुचीत जाती आणि अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनीयम कलम ३(१)(डब्ल्यु)(i)(ii), ३(२)(व्हिए) |
| ३. | आरोपीचे नांव, वय, पत्ता | :- | १) निवृत्ती देवराम काळभोर, रा- प्लॉट नं बी/५, औंदुबर निवास, साई हौसींग सोसायटी, गुरुद्वारा, चिंचवड, पुणे<br>किर्ती शाळेचे प्रिंसीपल २) अशोक जाधव,<br>तसेच लि सोफिया इज्यु. सोसायटी पुणे रजि क्रं १४५९, ट्रस्ट एफ/२५५६/पुणे या ट्रस्टचे अध्यक्ष ३) रोहिदास बलभिम जाधव, ४) लक्ष्मण नामदेव हेंद्रे, ५) अविंद्र अंकुश निकम, ६) गोरख सोपान जाधव, ७) हनुमंत दादा निकम, आणि ८) शुभांगी अशोक जाधव |
| ४. | आरोपी अटक आहे किंवा नाही | :- | आरोपी ताब्यात आहेत. |
| ५. | गुन्हा घडला ता.वेळ. ठिकाण | :- | सन २०२२ ते दिनांक २१/०८/२०२४ रोजी सकाळी १०/०० वा. चे सुमारास दरम्यान वेळोवेळी किर्ती विदयालयाचे अवारामध्ये, प्राधिकरण, निगडी पुणे |

निगडी पोलीस स्टेशन हद्दीतील साधारण गेले दोन वर्षांपासुन वेळोवेळी किर्ती विदयालयाचे अवारामध्ये, प्राधिकरण, निगडी पुणे येथील शिक्षक आरोपी नामे निवृत्ती काळभोर हा पिडीत मुलीस वारंवार लैंगीक त्रास देत असुन आरोपी निवृत्ती काळभोर याने पिडीत मुलीचा विनयभंग केल्याची तक्रार पिडीत मुलीचे वडीलांनी पोलीस ठाणेस दिल्याने गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच यातील आरोपी निवृत्ती काळभोर याचेविरुध्द यापुर्वी निगडी पोलीस ठाणे येथे गु.रजि नंबर ८२७/२०१८ भादवि कलम ३५४(अ) सह पॉक्सो ॲक्ट कलम ७,८, १२ अन्वये दाखल असुन सदर गुन्हयामध्ये निवृत्ती काळभोर याला न्यायालयाने शिक्षा दिली आहे,

तरीसुध्दा त्या शिक्षकाला शाळा व्यवस्थापनाने पुन्हा शाळेत नोकरी दिली ही बाब चुकीची आहे. अशा वृत्तीच्या माणसाला शिक्षा झाली आहे हे माहित असताना देखील शाळेत नोकरीवर पुन्हा घेणे हे एका पध्दतीने लैंगीक अत्याचाराच्या गुन्हयांना प्रोस्ताहन दिल्यासारखे आहे. म्हणुन शिक्षक निवृत्ती काळभोर, तसेच शाळेचे प्रिंसीपल अशोक जाधव, तसेच लि सोफिया इज्यु. सोसायटी पुणे रजि क्रं १४५९, ट्रस्ट एफ/२५५६/पुणे या ट्रस्टचे अध्यक्ष रोहिदास बलभिम जाधव, लक्ष्मण नामदेव हेंद्रे, अविंद्र अंकुश निकम, गोरख सोपान जाधव, हनुमंत दादा निकम, आणि शुभांगी अशोक जाधव यांचेविरुध्द फिर्यादी यांनी तक्रार दिलेने गुन्हा नोंद करणेत आला आहे.

सदर आरोपीस तात्काळ निगडी पोलीस ठाणे यांनी अटक केली असून यातील संस्थेचे पदाधिकारी यांनाही अटक केले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड,श्री.विनयकुमार चौबे,मा.सह पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड श्री.डॉ.महावरकर,मा.पोलीस उप-आयुक्त सो,परि-१ श्रीमती स्वना गोरे, यांचे मार्गदर्शखाली मा.सहा पोलीस आयुक्त सो,चिंचवड विभाग श्री.पाटील हे तपास करीत आहेत.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-०१ पिंपरी चिंचवड